**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 8, Aug - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 04/08/2021 Accepted on : 19/08/2021 Publication Date:31/08/2021

# कमल देसाई यांचे साहित्यातील योगदान

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**
**प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,**
**श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. औरंगाबाद**
Email - wawgesavita@gmail.com

**सारांश**: जगण्याची विविध रूप मांडणारी कादंबरी म्हणजे 'हॅट घालणारी बाई' स्त्रीचे प्रतिकात्मक स्वरूपात चित्रण करणाऱ्या कमल देसाई नी स्त्रीला प्राप्त पर्यावरणाला छेद देता ना तिची तथाकथित स्त्रीत्वातून मुक्तावस्था चित्रित करून खऱ्या अर्थी स्त्रीवादी भारतीय स्त्रीवादीवृत्तीला साकार केले आहे. या कादंबऱ्या स्त्रीने लिहिलेल्या असल्या तरी स्त्री जातीय नाहीत. त्या स्त्रीवादी जाणीवेतून आकारलेल्या 'स्त्री' ची स्वतंत्रपणे शोध घेणाऱ्या व समाजमाणसातील प्रस्थापित स्त्री प्रतिमा पुसून तिथे तिची माणूस म्हणून प्रतिष्ठापणा करू पाहणाऱ्या आहेत. कमल देसाई नी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या नायिका चितारून नवस्त्री प्रतिमा साकारली.

कमल देसाईंच्या या नायिका मुळातूनच पारंपारिक ढाचातल्या नाहीत. त्या स्वायत्त आहेत सहज जीवनाच्या प्रतिनिधी आहेत. विशिष्ट परिस्थितीमुळे त्या वेगळे अवकाश निर्माण करण्यासाठी धडपडतात असे मुळीच नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्या जसे स्वत:ला हवे तसेच जगतात. त्यांची कुठेही कातर जाणीव देत नाहीत. स्वाभिमान व स्वत्व ही त्यांची खरी ओळख आहे. आपल्या आत्म्याला प्रमाण ठरवून जगतांना सहवासात येणाऱ्या असली, नकली माणसांची बरोबर नोंद या नायिका देतात. पारंपारिक पठडीतले जीवन जगत असूनही त्या अंतराचे स्वतंत्रपणे जोपासत आहेत, हे दर्शन स्त्रीत्वाचा शोध घेतांना महत्त्वाचा भारतीय संदर्भ प्रस्तूत करतात. त्यामुळे कमल देसाई अस्सल स्त्रीवादी संदर्भ उपलब्ध करून देणाऱ्या महत्त्वाच्या स्त्रीवादी लेखिका ठरतात.

**मुख्य शब्द:** वास्तववादी, अस्तित्ववादी, स्त्रीवादी, मनोविश्लेषण, वर्चस्ववादी.

कमल देसाई महाराष्ट्र – कर्नाटक सीमेवर बेळगाव धारवाड या गावांमध्ये कमल देसाई यांचे बालपण आणि शालेय शिक्षण झाले. त्यांनी कथा, नाटक, कविता, अनुवाद,समीक्षा असे विविध साहित्यप्रकार सहजपणे हाताळले आहेत. त्यांच्या साहित्यातच नव्हे तर तत्वज्ञान, सौंदर्यशास्त्र, दृश्यकला, सामाजिकशास्त्रे, चित्रपट या विषयामध्ये त्यांचा रस होता. विसाव्या शतकातील भारतीय स्त्री लेखनाची परंपरा सांगतांना कमल देसाईचे लेखन ठळकपणे उठून दिसते गूढ जाणिवांचा त्यांच्या कथा प्रारंभी म्हणजे 1960 नवकथांच्या सुरुवातीला काहीशा वेगळ्या व स्त्री जाणिवांचे पदर उलगडणाऱ्या ठरल्या. भाषाशैली काहीशी कठीण सुरुवातीला दुर्बोध होती. मानवी नातेसंबंधातील 'एक काळी बाजू' मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला माणसाच्या आयुष्यातील एकाकीपणा, भग्नता त्यांनी मांडली त्यांचा विरोध कुठल्या पुरुषांवर नव्हता तर समाजव्यवस्था व पुरुषांमध्ये त्यांनी मानसिकता याला सदैव त्यांनी खलनायकाच्या रुपात पाहिले 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग', याच पुरुषी मनोवृत्तीवर त्यांनी बोट ठेवले. 'काळा सूर्य', 'हॅट घालणारी बाई' या कादंबऱ्यांमधून त्यांनी खऱ्या अर्थाने स्त्रीवादी लेखनाचा व मानवी जीवनातील आंदोलनाचा पाया घातला. 'गौरी देशपांडे' व 'सानिया' यांनी त्यांचा वारसा चालू ठेवला. परंतु कमल देसाईंची स्त्रीविषयक प्रश्नांची उकल ही मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून होती. त्यांनी तात्कालीन साहित्याला स्पर्श न करणारे काहीसे वेगळे विषय आपल्या साहित्यात मांडले. त्या जेव्हा लिहू लागल्या तेव्हा देव,धर्म आणि एकूण विश्व तसेच लैंगिकता या विषयावर पुरुषी विचारांची वर्चस्ववादी छाया होती. स्त्री स्वातंत्र्याला मान देणारी त्यांची लेखणी पुरुषी तत्त्वांचा विरोध करणारी नसून 'स्त्रीसाठी एक मन आहे' या विचाराचा पुरस्कार करणारी होती. स्त्रीला उपयोगाची वस्तू म्हणून न बघता मानवी मनाच्या पातळीवर तिचा विचार केला जावा ही अपेक्षा त्यांच्या लेखनातून दिसते.

इंग्रजी साहित्य शिकविणाऱ्या शिक्षिका असल्यामुळे त्या इंग्रजी साहित्यातील उदारवादी विचार मराठी साहित्यातून मांडणारा होत्या, त्यामुळेच स्त्री पुरुष संबंध व स्त्रीयांचे प्रश्न यावर कमल देसाई यांनी अतिशय उघडपणे आपले विचार मांडले. अत्यल्प व मोजके लेखन करणाऱ्या त्या असल्या तरी त्यांना स्वतंत्र बाण्याची लेखणी म्हणून ओळखले गेले अस्तित्ववादी, अतिवास्तवतावादी, स्त्रीवादी अशा नानाविध दृष्टिकोनातून अमूर्त जाणीवेच्या मानवी संबंधावर भाष्य करणाऱ्या या लेखिका अलिप्तपणे आपली साहित्यिक क्षमता सिद्ध करण्यात यशस्वी ठरल्या. 1960 नंतर मानवी जीवनात झालेले अनेक बदल त्यांच्या कथेतून कादंबरीतून आले महानगरीत

**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 8, Aug - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 04/08/2021 Accepted on : 19/08/2021 Publication Date:31/08/2021

जाणिवेतून नात्यांची पोकळी व रिकामेपण त्यांच्या कथेतून दिसून येते. कमल देसाई या मानवी जीवनातील घुसमट कोंडी आपल्या नायिकेद्वारे व्यक्त करण्याचा प्रयत्न करायच्या. त्यांची कथा व कादंबरी ही स्त्रीवादी नसून स्त्रीमनाचा पुरस्कार करणारी होती. मनोविश्लेषणाचा आधार घेणारी त्यांची कथा असली तरी, मनाची अतिरेकी पिंजण, अप्रकट मनातील भावव्यापार यातून येणारी दुर्बोधता व सज्ञाप्रवाही विचारांचा मागोवा घेणारी त्यांची कथा तात्कालीन साहित्यात वेगळी उठून दिसली.

साहित्यिकांची बालपणाची पार्श्वभूमी त्यांच्या साहित्यावर साहित्यावर कळत नकळत संस्कार करत असते. त्याप्रमाणे कमल देसाई या धारवाडच्या निसर्ग संपन्न परिसरातून 'मुंबई' या महानगरीत आल्या व त्यातच बकाल भाग ओळखल्या जाणाऱ्या परिघावरील उपनगरांमध्ये त्या शिक्षिका म्हणून राहिल्या व त्यातील भकासपणाचा अनुभव त्यांनी घेतला. त्यांच्या घरात इंग्रजी साहित्याचा अभ्यास व वाचन भरपूर होते. परंतु त्यांनी स्वतः मात्र मराठी साहित्याचा पदव्युत्तर अभ्यास केला. मराठी भाषा साहित्य शिकण्यास सुरुवात केली. भारतातील जीवन शैली, आपली कथा, आपले विज्ञान, आपले सौंदर्यशास्त्र शोधावे अशी तीव्र आस त्यांना होती. त्यांचे लेखन आव्हानात्मक होते. स्वतःच्या आत स्वतःला दडविणाऱ्या कमल देसाई भ्रांतिकेच्या या अतुलनीय शक्तींनी आपल्या मनातील भयाच्या बागुलबुवाला कायम सोबती करतात आपल्याच आत बुडण्याची कला कमल देसाईंना अजब रितीने साधली आहे.

कमल देसाई लेखिका म्हणून मान्यता पावल्या असल्या तरी सर्वसामान्यांच्या आकलन दृष्टीला झेपावणारे साहित्य त्यांचे नव्हते. म्हणूनच म्हणावी तेवढी प्रसिद्धी त्यांच्या साहित्याला मिळाली नाही. कमल देसाई यांना जेव्हा विचारले गेले की तुमचे लेखन स्त्रीकेंद्रित आहे परंतु चांगल्या अर्थाने स्त्रीवादीही आहे असे म्हटले तर तुम्हालाच ते मान्य होईल का? या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणतात 'हो, हो। का नाही? मान्य होणार, आवडेल मला, मात्र हेही खरे की मी लिहीत असताना मात्र असे काही करते आहे हे मला माहीत नव्हते. एवढेच की मी एक स्त्री असल्यामुळे स्त्रियांच्या भावना मला उपजतच कळत होत्या, त्याच प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे मराठी वाड्.मयामध्ये अल्प साहित्य लिहिणाऱ्या कमल देसाई यांचे स्थान वेगळ्या धाटणीची लेखिका म्हणून आपल्या सगळ्यांना माहीत आहे.

काळा सूर्य नवा आशय देणारी अतिशय विलक्षण अशी महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणता येईल मीरा नामक स्त्री व्यक्तिरेखेचे व अनुषंगाने प्रस्थापित सांस्कृतिक सामाजिक परंपराचे त्यातील अर्धकच्च्या धारणांचे चित्र विशेष सामर्थ्याने काढलेले काळा सूर्य मध्ये पाहायला मिळते मीराचे एक व्यवस्था विरोधी व्यक्तिचित्र कमल देसाई नेमकेपणाने चित्रित करतात. एकूणच सामाजिक रूढी प्रथा परंपरा एकदम विसंगत असे तिचे वर्णन हे वैज्ञानिक दृष्टिकोन मांडणारेच वाटते असे असले तरी परंपरावादी असणारे तिचे वडील तिच्या वर्तनाचा विरोध करतांना दिसतात केवळ विरोधच करीत नाही. तर तिचे नाव घेणेही ते पसंत करीत नाही. या कादंबरीची नायिका चितारतांना लेखिकेचे आगळे समाजभान प्रकट झाले आहे.

प्रस्थापित व्यवस्था तिला 'स्त्रीत्व' देऊ करीत होती. म्हणजेच शालीन, नम्र, सहिष्णू, सतत दुसऱ्यासाठी जगण्याचे व्रत अंगीकरणे इत्यादीचा स्वीकार करायला लावणे, या प्रयत्नांनाच ती उधळून लावत वाढू लागते. रूढ पारंपारिक, नेमस्तपणे जगत दुबळ्या झालेल्या माणसांपेक्षा या दुबळ्या माणसांच्या जगात प्रस्थापित, धार्मिक, सांस्कृतिक, सौंदर्य संकल्पनांमुळे व्यथित जगणे वाट्यास आलेल्यांविषयी तिला अधिक कणव वाटते. तसेच या दुबळ्या असणाऱ्या प्रस्थापित समाजाला न जुमानता स्वतंत्र जगणाऱ्या धडाडीच्या स्वयंप्रज्ञ पावले उचलणाऱ्या माणसांविषयी तिला आकर्षण वाटते. कमल देसाई यांनी स्त्री जीवनाला आकार देणाऱ्या धार्मिक सांस्कृतिक रूढी वास्तविक तिचे शोषण करतात. हे वास्तव नेमकेपणाने चित्रित केले आहे. स्त्री जीवनात खोलवर रुजलेल्या श्रद्धांचे दर्शन घडवून त्यातील लपलेल्या शोषण व्यवस्थावर प्रकाश पाडला आहे. पारंपारिक सांस्कृतिक संकल्पना, स्त्रीपुरुषांच्या - वर्तनाचा कार्य-कारणभाव असतात हे स्पष्ट करणारे तपशील कमल देसाई यांनी मांडले आहेत.

जगण्याची विविध रूप मांडणारी कादंबरी म्हणजे 'हॅट घालणारी बाई' स्त्रीचे प्रतिकात्मक स्वरूपात चित्रण करणाऱ्या कमल देसाईंनी स्त्रीला प्राप्त पर्यावरणाला छेद देतांना तिची तथाकथित स्त्रीत्वातून मुक्तावस्था चित्रित करून खऱ्या अर्थी स्त्रीवादी भारतीय स्त्रीवादीवृत्तीला साकार केले आहे. या कादंबऱ्या स्त्रीने लिहिलेल्या असल्या तरी स्त्री जातीय नाहीत. त्या स्त्रीवादी जाणीवेतून आकारलेल्या 'स्त्री' ची स्वतंत्रपणे शोध घेणाऱ्या व समाजमाणसातील प्रस्थापित स्त्री प्रतिमा पुसून तिथे तिची माणूस म्हणून प्रतिष्ठापणा करू पाहणाऱ्या आहेत. कमल देसाईंनी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या नायिका चितारून नवस्त्री प्रतिमा साकारली.

कमल देसाईंच्या या नायिका मुळातूनच पारंपारिक ढाचातल्या नाहीत. त्या स्वायत्त आहेत सहज जीवनाच्या प्रतिनिधी आहेत. विशिष्ट परिस्थितीमुळे त्या वेगळे अवकाश निर्माण करण्यासाठी धडपडतात असे मुळीच नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्या जसे स्वत:ला हवे तसेच जगतात. त्यांची कुठेही कातर जाणीव देत नाहीत. स्वाभिमान व स्वत्व ही त्यांची खरी ओळख आहे. आपल्या आत्म्याला प्रमाण ठरवून जगतांना सहवासात येणाऱ्या असली, नकली माणसांची बरोबर नोंद या नायिका देतात. पारंपारिक पठडीतले जीवन जगत असूनही त्या अंतराचे स्वतंत्रपणे जोपासत आहेत, हे दर्शन स्त्रीत्वाचा शोध घेताना महत्त्वाचा भारतीय संदर्भ प्रस्तूत करतात. त्यामुळे कमल देसाई अस्सल स्त्रीवादी संदर्भ उपलब्ध करून देणाऱ्या महत्त्वाच्या स्त्रीवादी लेखिका ठरतात.

**कमल देसाई यांचे प्रकाशित साहित्य**

- काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई
- रंगएक कथासंग्रह
- रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग

**कमल देसाई यांचे इतर साहित्य**

- बर्नर्ड बोझांकिटच्या 'थ्री लेक्चर्स ऑन एस्थेटिक' या ग्रंथाचा मराठी अनुवाद
- किरण नगरकर यांच्या 'द ककल्ड' (मराठी अनुवादया कादंबरीला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना (प्रतिस्पर्धी-
- प्रसिद्ध चित्रकार पॉल गोगॅच्या 'ओल्ड गोल्ड ऑन देअर बॉडी' या पुस्तकाच्या प्रभाकर कोलते यांनी केलेल्या अनुवादाला लिहिलेली प्रस्तावना

**संदर्भग्रंथ सूची:**

**१.** कमल देसाई (१९७५) 'काळा सूर्य', मौज प्रकाशन मुंबई.
**२.** कमल देसाई (१९७५) 'हॅट घालणारी बाई', मौज प्रकाशन मुंबई.
**३.** प्रा.सौ.कुसुमावती देशपांडे, (१९७५) मराठी कादंबरी भाग -२ मुंबई.
**४.** सप्रे अविनाश (२०००), 'प्रदक्षिणा', खंड भाग -२, पुनर्मूद्रण, कॉन्टीनेंन्टल प्रकाशन, पुणे.